**ठळक बातम्या**

- पोलिस स्मृतिदिनानिमित्त देशाचं शहीद पोलिसांना अभिवादन
- दिवाळीनिमित्त जगाच्या कानाकोपऱ्यातून शुभेच्छा
- गुजरात आणि हरियाणाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत ७३० कोटी रुपयांचं अनुदान

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेता असरानी यांच्या निधनाबद्दल मान्यवरांना शोक

**<><><><><>**

**आज पोलीस स्मृतिदिन** आहे. १९५९ मध्ये याच दिवशी लडाखमधे हॉट स्प्रिंग्ज इथं सशस्त्र चिनी सैनिकांनी केलेल्या हल्ल्यात दहा शूर पोलिसांना वीरमरण आलं. तेव्हापासून दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणून साजरा केला जातो.

**उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन** यांनी आज पोलीस स्मृतिदिनानिमित्त पोलीस कर्मचाऱ्यांच्या सर्वोच्च बलिदानाला अभिवादन केलं. राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी तसंच लोकांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी पोलिसांच्या वचनबद्धतेचा देशवासियांना आदर आहे, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही** पोलिस कर्मचाऱ्यांनी कर्तव्य बजावताना दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचं स्मरण करून त्यांना आज श्रद्धांजली वाहिली. संकटाच्या वेळी पोलिसांचं दृढ समर्पण, शौर्य आणि वचनबद्धता देशाला सुरक्षित ठेवते, असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही** आज नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय पोलीस स्मारकात शहीदांना पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. सैन्य आणि पोलीस यांचं राष्ट्रीय सुरक्षा हे एकच ध्येय आहे, सैनिक भौगोलिक अखंडतेचं, तर पोलीस भारताच्या सामाजिक अखंडतेचं रक्षण करतात, असं राजनाथ सिंह यावेळी म्हणाले. यावेळी केंद्रीय सशस्त्र पोलिस दल आणि दिल्ली पोलिसांची संयुक्त परेड आयोजित करण्यात आली होती.

**महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही** आज मुंबईतल्या नायगाव इथल्या पोलीस मुख्यालयात पोलीस स्मृतीस्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून त्यांना अभिवादन केलं. आपलं कर्तव्य बजावताना वीरमरण आलेल्या भारतातल्या विविध पोलीस दलांमधल्या अधिकारी आणि अंमलदारांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी असलेल्या संदेशपत्राचं यावेळी वाचन करण्यात आलं. हे राष्ट्र पोलिसांचं बलिदान कधीही विसरणार नाही, असं मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

देशातल्या सर्व राज्यांमधे पोलीस स्मृतीदिनानिमित्त अभिवादनाचे कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करातल्या कपातीमुळे गेल्या महिन्यात २२ तारखेपासून, जीएसटी बचत उत्सवाला सुरुवात झाली आहे. त्याचा फायदा समाजातल्या सर्व घटकांना होत आहे. जीएसटी बचत उत्सवाचा, देशाच्या वाहन क्षेत्राला बळकटी देण्यात, किती महत्त्वाचा वाटा आहे, त्याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**व्हीसी**

*(सरकारने वाहन क्षेत्रासाठी जारी केलेल्या नव्या जीएसटी दरांनुसार, अठराशे सीसीपेक्षा कमी इंजिन क्षमता असलेल्या ट्रॅक्टरवर ५ टक्के तर अठराशे सीसीपेक्षा जास्त इंजिन क्षमता असलेल्या ट्रॅक्टरवर १८ टक्के कर आकारला जातो. तसंच, टायर आणि गिअर्स सारख्या ट्रॅक्टर निर्मितीमध्ये वापरल्या*

*जाणाऱ्या सामग्रीवर ५ टक्के कर आकारला जात आहे. बस आणि ट्रक तसंच डिलिव्हरी व्हॅनवर आकारला जाणारा जीएसटी १८ टक्के करण्यात आला आहे. यापूर्वी या वाहनांवर २८ टक्के जीएसटी आकारला जात होता. यासह मोटार आणि दुचाकी वाहनांच्या निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या सामग्रीवरचा करही १८ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. या दरकपातीमुळे सामान्यांना परवडणाऱ्या किमतीत वाहनं विकत घेता येतील, वाहतुकीवरचा खर्च कमी होऊन निर्यातीवर त्याचा सकारात्मक परिणाम होणार आहे.)*

**<><><><><>**

दीपावलीचा सण सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. आज घरोघरी तसंच व्यावसायिक आस्थापनांमध्ये लक्ष्मीपूजनाचा सोहळा पार पडेल. व्यापारी वर्गासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या वर्षभराची खतावणी बंद करुन नवीन चोपडा सुरु केला जातो. लक्ष्मीपूजनाच्या निमित्तानं  मुंबई शेअर बाजारात आज  मुहूर्ताच्या सौद्यांचं सत्र,  दुपारी पावणे दोन वाजता सुरू होईल आणि दुपारी पावणे तीन वाजता बंद होईल.  या पूर्वी  लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी मुहूर्ताचे सौदे होत असत. मात्र, सायंकाळी घरोघरी लक्ष्मीपूजन असल्यामुळे अनेकांना त्यात भाग घेता येत नसे, हे लक्षात घेऊन शेअर बाजाराच्या मुहूर्ताच्या सौद्यांची वेळ यावर्षीपासून बदलण्यात आली आहे.

बाजारपेठा, घरं आणि कार्यालयं आकर्षक रोषणाईने सजवण्यात आली आहेत. सर्वत्र आनंदाचं आणि मंगलमय वातावरण दिसत आहे. दिवाळीनिमित्त सर्वजण एकमेकांना शुभेच्छा आणि भेटी देत असून, घ रोघरी विविध आकारांचे आकाशकंदील आणि मनमोहक रांगोळ्या सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. दिवाळीनिमित्त शास्त्रीय संगीताच्या मैफिलींचं आयोजन ठिकठिकाणी करण्यात आलं आहे. राज्य सांस्कृतिक संचालनालयातर्फे मुंबईत विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले भारतीय उत्साहात दिवाळी साजरी करत असून विविध जागतिक नेत्यांनीही दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळी हा अंधारावर प्रकाशाचा विजय असल्याचं अमेरिकेच्या व्हाइट हाऊसनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप, अमेरिकी गुप्तचर खातं एफबीआय चे प्रमुख काश पटेल, कॅनडा आणि यूनायटेड किंगडमचे प्रधानमंत्री, युक्रेनचे परराष्ट्रमंत्री तसंच ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि सिंगापुरच्या नेत्यांनी तसंच ब्राझील आणि विविध युरोपीय देशांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दुबईतल्या बुर्ज खलिफा या सर्वात उंच इमारतीवर काल दिवाळीनिमित्त लेसर शो ची रोषणाई केली होती. त्यात दिवाळीच्या शुभेच्छा झळकल्या होत्या. इस्राइलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यानाहू यांनी प्रधानमंत्री मोदी आणि भारतीय जनतेला शुभेच्छा देताना दोन्ही देशातील सौहार्दाचा उल्लेख केला आहे.

**<><><><><>**

१५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रसरकारने गुजरात आणि हरियाणाला ७३० कोटी रुपयांचं अनुदान जारी केलं. ग्रामीण स्वराज्य संस्थांच्या सशक्तीकरणासाठी या दोन्ही राज्याना आर्थिक सहाय्य करण्याची गरज वित्त आयोगाने वर्तवली होती. यापैकी ५२२ कोटी रुपयांचा दुसरा हप्ता आणि पहिल्या हप्त्यापैकी १३ कोटी रुपये गुजराथकडे वर्ग करण्यात आले आहेत. तर हरयाणाला २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा १९५ कोटी रुपयांचा पहिला हप्ता देण्यात आला आहे.

**<><><><><>**

जपानच्या संसदेने ताकाइची सानी यांना जपानच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री म्हणून निवडून दिलं आहे. जपानच्या संसदेच्या वरिष्ठ सभागृहात ताकाईची यांना १२५ मतं मिळाली तर कनिष्ठ सभागृहात त्यांना २३७ मतं मिळाली होती. लिबरल

डेमोक्रॅटिक पार्टीच्या नेत्या असलेल्या ताकाइची या जपान इनोव्हेशन पार्टीबरोबर एक नवीन युती सरकार स्थापन करणार आहेत. आज संध्याकाळी त्या पदभार स्वीकारतील.

ताकाईची यांची जपानच्या प्रधानमंत्री पदावर निवड झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे. भारत जपान दरम्यान धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी आपण ताकाइची यांच्याबरोबर काम करण्यासाठी उत्सुक असल्याचं मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध अभिनेता गोवर्धन असरानी यांचं काल मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. सहाय्यक अभिनेता आणि विनोदी अभिनेता म्हणून नाव कमावलेल्या असरानी यांनी पुण्याच्या चित्रपट प्रशिक्षण संस्थेत अभिनयाचे धडे गिरवले होते. अभिमान, गुड्डी, चुपके चुपके अशा अनेक चित्रपटांमधे त्यांनी मुख्य कलाकारांच्या बरोबरीने प्रेक्षकांवर ठसा उमटवला होता. फकीरा आणि चला मुरारी हीरो बनने या चित्रपटांमधे त्यांनी मुख्य भूमिका साकारली होती. त्यांची शोले चित्रपटातील जेलरची भूमिका चिरस्मरणीय ठरली. मुंबईत काल त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी असरानी यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. असरानी यांनी आपल्या भूमिकांमधून असंख्य प्रेक्षकांना आनंद दिला, असं प्रधानमंत्र्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे. असरानी यांच्या निधनाबद्दल राजकीय आणि मनोरंजन क्षेत्रातल्या विविध मान्यवरांनी समाज माध्यमावर त्यांना आदरांजली वाहिली आहे. गेल्या अनेक दशकांपासून प्रेक्षकांचं मनोरंजन करणारे असरानी हे एक प्रतिभावान कलाकार होते. भारतीय चित्रपट क्षेत्रात त्यांचं योगदान कायम स्मरणीय राहील, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले आहेत. **ए**क कुशल

अभिनेता, विनोदवीर आणि प्रतिभावान कलाकार गमावल्याची भावना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली आहे. **अ**नेक दशकं प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणाऱ्या असरानी यांच्या निधनाचं वृत्त अतिशय दुःखद असल्याचं काँग्रेस नेता राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**